Code -07
Total No. of Questions 06

MODEL QUESTION PAPER –I

नमुना प्रश्नपत्रिका –1

PUC .SECOND YEAR

विषय : मराठी Subject : Marathi

MAX MARKS-100 Time : 3.15 Hours

---

**सूचना :**
1) हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.
2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
3) व्याकरणाचे सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

**प्रश्न 1 ला. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा** **1x10=10**

1) खेळाचे जीवनातील स्थान
2) विज्ञानाचे चमत्कार
3) मराठी– मातृभाषेचे महत्त्व

**प्रश्न 2 रा अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा** **1x5=5**

4) आई बालकाला गोसाव्याकडे देऊन कोठे गेली होती?
5) लष्करांच्या छावणीचा तळ कोणत्या गावी उभारण्यात आला होता?
6) वीरराणी कित्तूर चन्नम्माच्या आईवडिलांचे नाव लिहा
7) सई रागाने कोणाला ओरडत होती?
8) लेखक गं. बा. सरदार याचे उच्च शिक्षण कोणत्या महाविद्यालयात झाले होते?
9) नलुने आई वडीलांवर कोणता आरोप केला होता?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **1x6=6**

10) “आजीचे भाष्य” या पाठातील आजीविषयी माहिती सांगून देवदेवता संबंधी तिचे विचार स्पष्ट करा.
11) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन गुरूविषयी माहिती लिहा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा ( कोणतेही दोन)** **3x2=6**

12) राऊळी लेकरूवासि जतन केली असे... राऊळ माय : राऊळ बापु :
13) कुणबी घर धरून जीव घेऊन राहिले आहेत हे हि जाऊ लागतील
14) “तेव्हा उठा! शस्त्राच्या कोठारात जा आणि हाताला मिळेल ते हत्यार घेऊन लढण्यास तयार व्हा”

**ड) टीपा लिहा ( कोणत्याही दोन)** **2x4=8**

15) शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य लिहा.
16) लेखक गं. बा. सरदार यांचे कौटुंबिक जीवन लिहा.
17) अप्पासाहेब बेलवलकरांचा करारी स्वभाव लिहा.

**प्रश्न 3 रा. अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **1x5=5**

18) विश्वात कोणाची मांदियाळी आहे ?
19) मानवाने सुख कशात मानले आहे ?
20) विठ्ठलाच्या नामस्मरणाने कशाचे पर्वत जळतील?
21) आरसा कोणासाठी उपयोगी नाही?

22) गोफ कशाचे प्रतिक आहे?

23) घरातल्या घरात गजबजलेलं गाव कोणतं आहे?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **1x6=6**

24) "सखी" या कवितेतील वास्तव जीवनाचे वर्णन लिहा.

25) " निष्ठा" या कवितेचा भावार्थ सांगून कवीने कोणती खंत व्यक्त केली आहे ते लिहा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा. ( कोणतेही दोन )** **3x2=6**

26) थांब , उलगडू गोफ कठिण हा शान्त बुध्दीने सखे असा
की न तुटावा पदर एकही : धागा धागा नीट तसा

27) आई असते जन्माची शिदोरी
सरतही नाही उरतही नाही

28) जावई माझा भला चांगला
तळहातावर झेलतो तिजला
दहाजनाचं दहा गुणाचं
खटलच लई तिच मोठं हाय

**ड) टीपा लिहा ( कोणतेही दोन)** **2x4=8**

29) 'सुंदर हिरवे माळ" या कवितेतील निसर्ग चित्रण लिहा.

30) 'सत्वर पाव गे मला' या भारूडाचा भावार्थ लिहा.

31) हंसपक्ष्याने आपल्या गृहस्थितीबद्दल राजाला काय सांगितले ?

**प्रश्न 4 था खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** **2x5=10**

32) गावातील पोरांनी बाबला का मारले ? गोंदा पाटील यांनी न्याय कसा मिळवून दिला ते लिहा.

33) विलासकाकांच दु:ख तुमच्या शब्दात लिहा.

34) आजंनाच्या भावाने आपल्या मुलीचे लग्न पंडिताबरोबर करण्यास नकार का दिला?

**प्रश्न 5 वा अ) खालील विषायावर आवेदन पत्र लिहा.** **1x5=5**

35) महात्मा जोतीराव फुले महाविद्यालयात मराठी विषयाच्या पदासाठी प्राचार्यांच्या नावाने अर्ज करा.

**ब) अधोरेखीत शब्दाच्या विभक्ती ओळखा .** **1x5=5**

36) <u>गीता</u> वर्गात फार हुशार आहे.

37) <u>अमोलने</u> आपल्या मित्राला मदत केली.

38) <u>पालकांनो</u> ! मुलांचा नियमितपणे अभ्यास घ्या.

39) <u>बागेत</u> फार सुंदर फुले आहेत .

40) <u>कांकाना</u> फार तहान लागली आहे.

**क) खालील वाकप्रचारांच्या योग्य जोडया जुळवा.** **1x5=5**

41 ) रामराम ठोकणे — फसविणे

42) हातावर तुरी देणे — भांडणे लावणारा

43) श्री गणेशा करणे — याचना करणे

44) कळीचा नारद — प्रारंभ करणे

45) पदर पसरणे — निरोप घेणे

**ड) खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.** **1x5=5**

46) तळे राखील तो ..............................

47) ठकास ..............................

48) घर फिरले की ..............................

49) गोगलगाय ..............................

50) न कर्त्यांचा ..............................

( पाणी चाखील , वासे फिरू लागतात, महाठक, पोटात पाय , वार शनिवार )

**इ) खालील अ गटातील शब्द समुहाला ब गटातील योग्य शब्द निवडून जोडया जुळवा.** **1x5=5**

| अ | ब |
|---|---|
| 51) भाषण करण्याची जागा | पाणपोई |
| 52) मोफत पाणी मिळण्याची सोय | ऐतखाऊ |
| 53) शत्रूला सामील झालेला | स्वगत |
| 54) श्रम न करता खाणारा | व्यासपीठ |
| 55) स्वत:शी केलेले भाषण | घरभेदी |

**प्रश्न 6 वा खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **1x5=5**

जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो, हा विचार सर्व संत महंतानी आणि विचारवंतांनी पुसून टाकण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. संताचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही , त्याला संतत्वाच्या आणि देवत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही. तोच खरा अस्पृश्य समजावा , ही विशाल आणि सर्व समावेशक दृष्टी संताच्या साहित्यातून प्रगट झाली आहे. “भेदाभेद भ्रम अमंगळ” आणि“ जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत” हा उदात्त विचार तर्कशुध्द आहे. आपल्या खांद्यावर जातीय उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे. ते फेकून दिले पाहिजे, हे अनेक संतानी गर्जून सांगितले आहे. परोपरीने सांगितले आहे . पण माणसाचा मुर्दाडपणा अलौकिक आहे. संताच्या कपाळावर त्याने जाती– वर्णाची लेबल तत्परतेने आणि धूर्तपणे चिकटविली. खरे तर साधूचीच काय सर्व सामान्याचीही जात माणूसच असते. माणूसच असावी माणसांची जाती वाढावी मानव्याची उंची वाढत जावी. हे संताचे स्वप्न आहे. पण हे घडत नाही. म्हणून संताच्या वाणीला अनेक वेळा हुंदके फुटलेले आहेत.

56) संत महंतानी कोणता विचार पुसून टाकण्याचा प्रयत्न केला ?

57) संतत्वाच्या व देवत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कोणाला नाही?

58) संत साहित्यातून कोणती दृष्टी प्रकट झाली आहे?

59) कोणता विचार उदात व तर्कशुध्द आहे.

60) संताचे स्वप्न कोणते होते?

Code -07
Total No. of Questions 06

MODEL QUESTION PAPER –II
नमुना प्रश्नपत्रिका –2
PUC .SECOND YEAR
विषय : मराठी Subject : Marathi

MAX MARKS-100 Time : 3.15 Hours

---

**सूचना** : 1) हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.
2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
3) व्याकरणाचे सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

**प्रश्न 1 ला. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा** **1x10=10**

1) खेडयातील एक लग्न समारंभ
2) माझा आवडता संत
3) झाडे लावा– झाडे जगवा

**प्रश्न 2 रा अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा** **1x5=5**

4) गोसाव्याने कोणा कोणामध्ये समेट घडवून आणला ?
5) राणी चन्नम्माला कोण कोणत्या भाषा अवगत होत्या?
6) महाराष्ट्रातील पहिल्या डॉक्टर स्त्रीचे नाव काय होते ?
7) आजीचे नाव कोणत्या देवीच्या स्मरणार्थ ठेवले होते?
8) लेखक गं. बा. सरदार यांचा जन्म कोणत्या गावी झाला आहे?
9) "जगाव की मराव" हा कोणापुढे पडलेला प्रश्न आहे?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **1x6=6**

10) शिवाजी महाराजांनी छावणीतील सैनिकांना कोण कोणत्या महत्वाच्या सूचना दिलेल्या आहेत ?
11) सईच्या करारी स्वभावाचे वर्णन लिहा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा ( कोणतेही दोन)** **3x2=6**

12) " नको, तेथला देव येथेही आहे"
13) " नोकरीसाठी मिन्नतवारी करावी, हे माझ्या स्वभावात नव्हत "
14) " नले मी – मी चोरी केली असा संशय आला तुला"

**ड) टीपा लिहा ( कोणत्याही दोन)** **2x4=8**

15) वीरराणी कित्तूर चन्नम्माने कलेक्टर थॅकरे यांच्याशी केलेल्या लढाईचे वर्णन लिहा.
16) ब्रिटीशांचा शिक्षणासंबंधी झिरपणीचा सिध्दांत लिहा.
17) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन दैवताविषयी माहिती लिहा.

**प्रश्न 3 रा. अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **1x5=5**

18) संसारीक माणूस कोण कोणत्या मोहात गुरफटतो ?
19) नामस्मरणाने कोणा कोणाचे रक्षण केले आहे ?
20) सुनेने कोणत्या देवीकडे प्रार्थना केली आहे?
21) शिवालय कोण बांधतात?

22) घरातल्या घरात गजबजलेलं गाव कोणते आहे?

23) कवयित्रीच्या घरी कोण जेवायला आले होते?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **1x6=6**

24) "पसायदान" याचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

25) " गोफ" या कवितेचा भावार्थ सांगून कोणता विचार सांगितलेला आहे.

**क) संदर्भासह स्पष्ट करा. ( कोणतेही दोन )** **3x2=6**

26) हीच अंतरंग शुध्दी, हीच बहिरंग शुध्दी
हीच आमच्या कूडलसंगमदेवास प्रसन्न करण्याची रीत.........

27) निवली राने गुरे- वासरे। निवली झाडे रानपाखरे
धनी अंतरी निवली सारे। शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधी पण जाळ?

28) तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थाचा क्रम चुकला
यात माझा काय दोष हे मला सांगशील का?

**ड) टीपा लिहा ( कोणतेही दोन)** **2x4=8**

29) हंसपक्षी व नलराजा यांच्यातील संवाद लिहा.

30) "निष्ठा" या कवितेत कोणती खंत व्यक्त केली आहे.

31) " जीव माझा गुंतलाय" या कवितेचा भावार्थ लिहा.

**प्रश्न 4 था खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** **2x5=10**

32) पाझर या कथेतील बाबलचे स्वभावचित्रण लिहा.

33) विलासकाकांना आईची आठवण का झाली? आईने काय सांगितले होते?

34) पंडिताला कोण- कोणत्या वाईट सवयी लागल्या होत्या? त्याचा परिणाम काय झाला?

**प्रश्न 5 वा अ) खालील विषायावर आवेदन पत्र लिहा** **1x5=5**

35) गावात वेळेवर बस येत नाही. त्यामुळे गावकरी व विद्यार्थ्यांना त्रास होत आहे.
त्या संदर्भात ग्रामपंचायत अध्यक्षांना तक्रार अर्ज लिहा.

**ब) अधोरेखीत शब्दाच्या विभक्ती ओळखा** **1x5=5**

36) <u>रमेशला</u> गोड फार आवडते.

37) <u>मुलांनो</u> ! नियमित व्यायाम करा.

38) <u>घरात</u> मुलांचा फार दंगा होता.

39) <u>नरेशने</u> वर्गात प्रथम क्रमांक मिळविला

40) <u>रामा</u> खूप अभ्यास करतो.

**क) खालील वाकप्रचारांच्या योग्य जोडया जुळवा.** **1x5=5**

41) बैजवार होणे उदास होणे

42) मन खिन्न होणे — सर्व व्यवस्थित होणे

51) न्यूनगंड वाटणे — अपमान करणे

52) पाणाउतारा करणे — खूप राग येणे

53) पारा चढणे — कमीपणा वाटणे

**ड) खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.** **1x5=5**

54) खाण तशी ..............................

55) करायला गेला गणपती ..............................

56) एकावे जनाचे ..............................

57) नाकापेक्षा..............................

58) चकाकते ते ..............................

( माती , करावे मनाचे, झाला मारूती , मोती जड, सोने नसते )

**इ) खालील अ गटातील शब्द समुहाला ब गटातील योग्य शब्द निवडून जोडया जुळवा.** **1x5=5**

| अ | ब |
|---|---|
| 51) दररोज प्रसिध्द होणारे | जिवलग |
| 52) जिवाला जीव देणारा | धबधबा |
| 53) उंचावरून पडणारा पाणलोट | नास्तिक |
| 54) देव नाही असे मानणारा | दरवेशी |
| 55) अस्वलाचा खेळ करणारा | दैनिक |

**प्रश्न 6 वा खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **1x5=5**

ललित लेखकाने हरतऱ्हाची माणसे व स्थळे पाहिली पाहिजेत. सज्जनांप्रमाणेच दुर्जनांचेही वेगवेगळे नमुने त्याने अवलोकन करून ठेवले पाहिजेत. राजांच्या राजप्रासादाप्रमाणेच जंगलातील खोपटीही त्याच्या पाहण्यात आली पाहिजेत. मनुष्य स्वभावाच्या हजार तऱ्हाची त्याच्याजवळ नोंद पाहिजे आणि उदात्त प्रसंगाप्रमाणेच गलिच्छ प्रसंगाचे हजार प्रकार त्याच्या अवलोकनात यावयास पाहिजेत. लेखकाचे अवलोकनाचे केंद्र संकुचित असले की त्याच्या कृतीत विविधता दिसत नाही. व कृती कंटाळवाणी वाटू लागते. हरिभाऊ आपट्यांचा मोठेपणा सरळ अंत:करणाला भिडणाऱ्य त्याच्या भाषेत व त्याच्या मार्मिक सुधारकी विचारसरणीत तर आहेच. पण त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिच्या व प्रसंगाच्या वैचित्र्यात तो अधिक आहे. मोठया लेखकाच्या कल्पनेची झेपच वाघासारखी पल्लेदार असते. याचे कारण त्याचे अवलोकनाचे क्षेत्र फार दांडगे असते.

56) ललित लेखकाने कोणती माणसे पाहिली पाहिजेत ?

57) ललित लेखकांनी कोण – कोणते प्रसंग अवलोकन केले पाहिजेत?

58) अवलोकनाचे केंद्र संकुचित असल्यास काय घडते?

59) मोठया लेखकांची झेप कशी असते?

60) मोठया लेखकाचे अवलोकन क्षेत्र असे असते?